# रंग होळीचे

आज लेकाच्या पुण्याच्या नव्या घरातला पहिला सण. होळीचा. होळी म्हणजे रंगांची उधळण. निसर्ग पण विविध रंगात रंगू लागलाय. शिशिरातल्या थंडीने आता पळ काढला आहे. हवेतला उष्मा नको जीव करू पाहतोय. मुंबईतही उकाडा आहे. पण मुंबई - पुणे हवामानात जमीन अस्मानाचा फरक !

आतापर्यंत हे वाचलेलं, पुणेकर नातेवाईक, मित्र मैत्रिणी ह्यांच्याकडून ऐकलेलं. आता मात्र त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेत होते.

सकाळी आठ वाजल्यापासून संध्याकाळी सहा वाजेपर्यंत घराबाहेर पडणं अशक्य झालंय. त्यामुळे होळीचा सण उद्यावर आला तरी माझी घरात सणासाठी पुरणपोळी बनवण्याची काहीच तयारी नव्हती. मन पण थोडं द्विधा मनःस्थितीत असल्यासारखंच. त्यालाही कारण आहे म्हणा. दहावीला असलेला मोठा नातू आणि त्याची आई म्हणजे माझी सून मुंबईला. मुलाचे ऑफिस म्हणून तो आणि आम्ही दोघे इथे पुण्यात.
नुकतेच, अगदी दहा दिवसांपूर्वीच आम्ही त्यांच्या पुण्यातल्या ब्लॉक मध्ये राहायला आलो होतो. इथे शेजारी पाजारी अजून फारशी कुणाशी ओळखही झाली नव्हती. आजूबाजूला असलेली दुकानं, हॉटेलं, पोळी भाजीचा डबा अशा शोधमोहीमेवर असलेली मी. आपल्या घरी राहायला आलोय खरे, पण अजून थोडं सुतारकाम बाकी आहे. सामानाचे मोठाले खोके घरात भिंतीकडेने रचून ठेवलेत.

पूर्वेचा सूर्य मी उगवलो बरं का म्हणत पार पश्चिमेच्या खिडकीशी हातमिळवणी करत घर उजळून टाकतोय. आणि दुपारची जेवणं उरकायची खोटी, लगेचच हा दिनकर पश्चिमेच्या खिडकीतून आपली सहस्त्र किरणं घरात फाकवत पार पूर्वेच्या खिडक्यांपर्यंत ललकारी द्यायला हजर! अशी सगळी गंमत.

पुणे तेथे काय उणे ही म्हण माहीत होती. पण होळीच्या एक दिवस आधी मला साधी पुरणपोळी मिळण्याची मुश्किल असं स्वप्नातही वाटलं नव्हतं.

एवढी दुकानं आहेत घरच्या जवळपास. कुठेतरी नक्कीच मिळेल पुरण पोळी. घरी करायला नाही जमणार म्हणा. नाहीतरी आजकाल सगळ्या गोष्टी दुकानात सहज आणि छान मिळतात. असं आपलं माझं साधं सरळ म्हणणं. मुलाने त्याच्या ऑफिसच्या व्यापातून वेळ काढून मला दोन वेळा आठवणही करून दिली होती पुरणपोळीची. पण माझा आत्मविश्वास दांडगा होता ना. हल्ली सगळ्या दुकानांमधून सगळे खाण्याचे पदार्थ अगदी कोणत्याही ऋतूमध्ये मिळतात. मग होळीच्या वेळी पुरणपोळी तर काय, मिळणारच मिळणार.
पण माझा चक्क भ्रमनिरास झाला हो.

आता पुण्यातलं लेकाचं घर आहे मॉडेल कॉलनीमध्ये. मॉडेल कॉलनी मधली जागा म्हणजे हार्ट ऑफ द सिटी मध्येच की. अर्थात हे आम्ही मुंबईकर नव्हे, तर चक्क पुणेकरच म्हणतात. आणि असं म्हणताना त्यांच्या भुवयाही जरा उंचावलेल्या मी स्वतःच्या डोळ्यांनी पाहिलं होतं. शहराच्या अशा मध्यवर्ती भागात राहायला आलेली मी फोनवर जेव्हा सुनेला म्हणाले की मला इथे दहा - बारा दुकानं हिंडून सुद्धा कुठेच पुरणपोळी मिळाली नाही तर मुंबईकर सून चक्क हसत राहिली.
मग मी तिला म्हटलं, "ठीक आहे ग. एखाद्या वर्षी होळीला पुरणपोळी नही तो श्रीखंड ही सही !"
आणि तिकडून नातवानेही फोनवर लगेच माझी बाजू घेत म्हटलं, "आजी, ये हुई ना बात. That's the spirit !"
मी श्रीखंडाचा डबा घेऊन घरी आले.

घरी आल्यावर दुसऱ्या दिवशीसाठी पोळ्या पाहिजेत ते सांगायला म्हणून पोळ्या देणाऱ्या मावशींना फोन केला. काय मनांत आलं माहीत नाही, मावशींना सहजच म्हणून गेले, "मावशी, तुम्ही पुरणपोळी करता ? म्हणजे विकायला म्हणून ?"
त्या म्हणाल्या, "नाही हो ताई."

अब क्या करे ? नव्या घरात बाप्पाला होळीला श्रीखंड पोळीचा नैवेद्य. बाप्पा कुठे कधी तक्रार करतो, का काही मागतो ? मीच माझ्या मनाची समजूत घातली. दुसऱ्या दिवशी सकाळी वरण-भात, कोशिंबीर, भाजी असा स्वयंपाक केला.

खालच्या दुकानातल्या मावशींकडून पोळ्या आणायला लेकाला पाठवलं. आणि मी तोपर्यंत जेवणाची पानं घेतली. नैवेद्याचं ताट वाढत होते.

मुलगा पोळ्यांचा डबा घेऊन आला आणि म्हणाला, "आई, मावशींनी साध्या पोळ्यांबरोबर दोन पुरणपोळ्या पण दिल्या आहेत डब्यात. मी त्यांना त्याचे पण पैसे घ्या म्हणालो. पण त्यांनी घेतले नाहीत. मावशी म्हणाल्या, अहो घरी माझ्या मुलांसाठी केल्या त्यातल्या दोन दिल्यायत तुमच्यासाठी."

मला इतकं भरून आलं. डोळे आनंदाने वाहण्याच्या बेतात. मुलाला म्हणाले, "बघ, आपल्या घरच्या देवालाच सगळी काळजी. तो आज असा ह्या मावशींच्या रूपाने उभा राहिला आणि आपली होळी साजरी करायला आला. त्याला पुरणपोळीचाच नैवेद्य हवा होता. आणि तो मिळाला."

भाज्या, फळं, थोडाफार किराणा विकणाऱ्या ह्या मावशी. त्यांचं दुकान आमच्या बिल्डिंगच्या बाहेरच आहे. सध्या माझी नड आहे म्हणून त्या मला पोळ्या देतात. नाहीतर एरवी पोळी -

भाजीचा डबा देणं हा त्यांचा व्यवसाय नाहीये. त्यांचं दुकान छान चालतं. त्या ते सांभाळतात. पण त्यांचा पोळीचा डबा परत देताना "कुणाचाही डबा परत देताना तो रिकामा कधी देऊ नाही, त्यात चमचाभर साखर तरी घालून द्यावा." हे आईने सांगितलेलं मी रोज अंमलात आणत होते. आज मावशींच्या रूपातल्या आईने पुरणपोळीचा घास आमच्या मुखी घातला. ह्या मावशींबरोबर नुकतीच दहा दिवसांपूर्वी झालेली ओळख. ती पण एक ग्राहक म्हणून. पण त्यांचं हे ऋण व्यक्त करायला मी असमर्थ आहे.

काही नाती अशीही जुळतात. रक्ताची नसली तरी प्रेमाची, माणुसकीची. त्या माणुसकीला माझा सलाम ! रंगांची उधळण करत आलेल्या होळीच्या सणाने आज माझ्यावर अशी निर्व्याज प्रेमाच्या रंगाची उधळण केली. आणि मग काय,
अवघा रंग एकचि झाला
रंगी रंगला श्रीरंग..... अशी माझी अवस्था झाली की !!

**- लीना माटे**